MHNG180014702020

# किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ३१७/२०२० निशाणी क्र. १ खाली आदेश
## मनिषा व इतर वि. प्रमोद व इतर
## (आज दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२१ रोजी पारित)

सदर प्रकरणामध्ये अर्जदाराचे विद्वान वकील श्री आर.आर. ठवरे हे दि. २४.०९.२०२१ रोजी न्यायालया समक्ष हजर झाले. त्यांनी असा व्युक्तिवाद केला की, गैरअर्जदारांनी दाखल केलेला लेखी जबाब हा सर्व गैरअर्जदारांच्या बाजुने ग्राहय धरता येणार नाही. त्यांनी पुढे असे नमुद केले की, निशाणी क्र. १५ हा अर्ज दि. २५.०२.२०२१ रोजी प्रकरण लेखी जबाबाविना चालविण्यासाठीचा आदेश बाजुला सारण्यासाठी दाखल केला होता. परंतु सदर अर्ज केवळ गैरअर्जदार क्र. १ यांनीच दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर लेखी जबाब हा पुर्ण आदेश बाजुला सारुन दाखल केलेला नाही. त्यामुळे तो विचारात घेता येणार नाही. याउलट, गैरअर्जदारांचे विद्वान वकील श्रह एन.डी. अंजनकर यांनी असे म्हणणे मांडले की, सदर बाब ही तांत्रीक स्वरुपाची आहे. तसेच न्यायालयाने दि. ०९.०९.२०२१ रोजी आदेश पारीत करुन सर्व गैरअर्जदारांच्या विरोधातील विना लेखी जबाबाचा आदेश बाजुला सारलेला आहे.

२. दोन्ही विद्वान वकीलांनी सुचविलेल्या बाबींवर विचार केला. सदर प्रकरणामध्ये स्पष्टता आणण्याकरीता प्रकरणाचे काटेकोरपणे निरिक्षण करणे आवश्यक आहे. सदर प्रकरण अर्जदार क्र. १ व २ यांनी एकुण ४ गैरअर्जदारांविरोधात दाखल केलेले आहे. त्यापैकी गैरअर्जदार क्र. १ प्रमोद हे सर्वप्रथम दि. ०५.०२.२०२१ रोजी प्रकरणात हजर झाले. सदर दिवशी नि.क्र. ७ अन्वये अर्ज दाखल करुन वकील नियुक्ती करण्याकरीता वेळ मागितला. त्यानंतर दि. ११.०२.२०२१ रोजी गैरजअर्जदार क्र. १ यांनी नि.क्र. ७–अ अन्वये जबाब दाखल करण्यासाठीचा अर्ज व निशाणी क्र. ८ वर अडॅव्होकेट श्री. के.एन. मोहीले यांचे वकीलपत्र दाखल केले. त्यानंतर दि. १८.०२.२०२१ रोजी गैरअर्जदार क्र. १ यांनी नि.क्र. ९ अन्वये अडॅव्होकेट श्री एन.डी. अजंनकर यांचे वकीलपत्र व नि.क्र. १० अन्वये लेखी जबाबासाठी वेळ मिळण्याचा अर्ज दाखल केला. वारंवार संधी देवुनही गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांचा

लेखी जबाब दिला नाही म्हणुन त्यांचे वर्तन नोंदवुन सदर प्रकरण गैरअर्जदाराच्या लेखी जबाबाविना चालविण्यात आले. तसा आदेश दि. २५.०२.२०२१ रोजी नि.क्र. १ वर करण्यात आला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे दि. १२.०३.२०२१ रोजी प्रकरणात हजर झाले. त्यांनी नि.क्र. १३ अन्वये वकीलपत्र पटलावर दाखल केले.

**३.** त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ यांनी नि.क्र. १५ अन्वये अर्ज दाखल करुन दि. २५.०२.२०२१ रोजीचा आदेश बाजुला सारण्यासाठीचा अर्ज दाखल केला. त्यावर अर्जदाराचे म्हणणे ऐकल्यानंतर दि. ०९.०९.२०२१ रोजी आदेश पारीत करण्यात आला. परंतु अनावधानाने नि.क्र. १५ खालील अर्ज हा गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी दाखल केला असे समजुन त्यावर आदेश पारीत करण्यात आले. सदर प्रकरणामध्ये दि. २५.०२.२०२१ चा आदेश कोणत्या गैरअर्जदारांविरुध्द होता हेच बघणे म्हत्वाचे आहे. त्याची पुनरावृत्ती येथे करण्यात येत आहे.

"N.A. No. 1 appeared in the proceeding. Thereafter, time was granted to file his W.S. However, he failed to file his W.S. till today. Hence, matter proceeded without W.S. of N.A."

**४.** सदर आदेशाचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आदेशामध्ये गैरअर्जदार क्र. १ यांच्या वर्तनाची नोंद घेतलेली आहे. आदेशामध्ये कोणतेही अनेकवचन वापरलेले नाही. याव्यतिरिक्त गैरअर्जदार क्र. २ व३ हे सदर आदेश पारीत केल्याच्या तारखेनंतर म्हणजे दि. १२.०३.२०२१ रोजी हजर झालेले आहे. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद वरील आदेशात घेण्यात आलेली नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ वगळता इतर गैरअर्जदारांविरोधात लेखी जबाबाविना चालविण्याचा आदेश अथवा प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश केला असल्याचे दिसुन येत नाही. गैरअर्जदार क्र. १ ने नि.क्र. १५ अन्वये सदर आदेश बाजुला सारण्याचा अर्ज दाखल केला. त्यावर आदेश करुन सदर अर्ज मंजुर सुध्दा करण्यात आला. परंतु अनावधानाने नि.क्र. १५ वरील आदेशामध्ये इतर गैरअर्जदारांचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

**५.** पटलाचे अवलोकन केले असता दि. २५.०२.२०२१ चा आदेश दि. ०९.०९.२०२१ च्या आदेशान्वये बाजुला सारण्यात आलेला आहे. तसेच इतर गैरअर्जदारांविरुध्द कोणताही ओदश

करण्यात आलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी दि. २०.०८.२०२१ रोजी दाखल केलेल्या संयुक्त लेखी जबाबाला विचारात घेता येईल असे माझे मत आहे.

६. या ठिकाणी हेही नमुद करणे आवश्यक आहे की, गैरअर्जदार हजर नाही या बाबीचा अर्जदार पक्षाला कोणतीही बाधा पोहचलेली नाही. उलटपक्षी, दि. २६.०२.२०२१ रोजी मी कलम २३ खालील अर्जावरती आदेश करुन अर्जदाराच्या पक्षामध्ये पोटगीचा सुध्दा आदेश झालेला आहे. सदर प्रकरणामध्ये सर्व गैरअर्जदारांचे म्हणणे लेखी जबाबातुन विचारात घेतल्यास सदर प्रकरण गुण व दोषांच्या आधारावर निकाली काढण्यासाठी उपयुक्त ठरणारे आहे. सदर बाब ही अर्जदारांच्याच फायदयाचे आहे. त्यामुळे प्रकरणातील परिस्थिती लक्षात घेता पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. दिनांक ०९.०९.२०२१ च्या आदेशाप्रमाणे खर्च रक्कम रु. ३००/- गैरअर्जदारांनी अर्जदाराला त्वरीत द्यावी.
२. उभय पक्षांनी प्रकरण लवकरात लवकर चालविण्याचे दृष्टीने योग्य ती पावले उचलावी.
३. उभय पक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी.

(ह.ना. पोले)
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**कोर्ट क्र. २, कळमेश्वर, जि. नागपूर.**

**कळमेश्वर.**
**दिनांक – ०७.१०.२०२१.**

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 07.10.2021 |
| Judgment dictated on | : | 07.10.2021 |
| Transcription Ready on | : | 07.10.2021 |
| Judgment checked and signed off | : | 07.10.2021 |

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर. एस.डवरे (ग्रेड ३)